जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2024
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागातील कार्यशाळेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत पार्थसारथी बिस्वास, डॉ. शिवाजी जाधव.

# पर्यावरणपूरक जीवनपद्धती अपरिहार्य : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

कोल्हापूर : जागतिक हवामान बदलांच्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी मानवाने पर्यावरण पूरक ज़ीवन पद्धती अवलंबणे अपरिहार्य आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित 'हवामान बदल आणि प्रसारमाध्यमे' या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रास्ताविक समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. ज्येष्ठ पत्रकार मोहसीन मुल्ला यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राधिका शर्मा यांनी सूत्रसंचालन केले. सुरज कांबळे यांनी आभार मानले. यावेळी निसर्गमित्रचे अध्यक्ष अनिल चौगले, ए. आय. बागवान, घोडावत विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे जयप्रकाश पाटील, प्रा. अभिजीत गुर्जर, जयसिंग चव्हाण, पार्थसारथी बिस्वास, विद्यार्थी उपस्थित होते.

0 1 FEB 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील 'वाणिज्य' शिक्षणाला आता 'आयसीएआय'चे पाठबळ

## नवी दिल्लीमध्ये सामंजस्य करार; संयुक्तपणे संशोधन करणार

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठ आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडिया (आयसीएआय) या संस्थेत सामंजस्य करार झाला आहे. या कराराचा विद्यापीठाचे विद्यार्थी तसेच शिक्षकांनाही मोठा लाभ होईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

नवी दिल्ली येथे नॅशनल एज्युकेशन समिट ऑफ कॉमर्स अँड अकौंटंन्सीमध्ये पहिल्या दिवशी सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठातर्फे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते. या करारावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि आयसीएआयचे सचिव डॉ. जयकुमार बत्रा यांनी स्वाक्षऱ्या केल्या. हा करार होण्यासाठी इन्स्टिट्यूटचे उपसंचालक डॉ. एन.एन. सेनगुप्ता आणि अधिष्ठाता डॉ. महाजन यांनी समन्वयाचे कार्य केले.

दोन्हीही संस्थांनी शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण यामध्ये केलेल्या कार्यातून ज्ञान आणि कौशल्य यासंदर्भात उत्कृष्टता निर्माण करण्याच्या प्रक्रियेसाठी या कराराच्या माध्यमातून एकत्रित काम करण्याचा निर्णय घेतला आहे. वाणिज्य विषयातील पदवी, पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक सहकार्य करण्याचे ठरविण्यात आले. त्या माध्यमातून या संस्थांच्या बौद्धिक जीवन व सांस्कृतिक विकास याबाबत सहकार्य केले जाईल. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने इन्स्टिट्यूट विशेष सत्रांचे आयोजन करून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याच्या कामी सहकार्य करणार आहे. संशोधन प्रकल्प, शिक्षक विकास कार्यक्रम तसेच क्षमता विकास कार्यक्रम आणि कार्यशाळा, परिषद व चर्चासत्र असे शैक्षणिक कार्यक्रमही संयुक्तपणे आयोजित करण्यात येतील. शैक्षणिक व व्यवसायिक ज्ञान व कौशल्याची देवाण-घेवाण होणार आहे.



**कोल्हापूर** : नवी दिल्ली येथे इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंन्स ऑफ इंडिया आणि शिवाजी विद्यापीठात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी डॉ. ज्योती बत्रा, सी. ए. रणजित कुमार अग्रवाल, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, सीए दयानिवास शर्मा उपस्थित होते.

01 FEB 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा 'आयसीएआय'सोबत करार

## नवी दिल्ली येथे 'नेस्का'च्या दोन दिवसीय उपक्रमात घेतला निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा नवी दिल्ली येथील दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया या आघाडीच्या संस्थेसमवेत सामंजस्य करार झाला. याचा विद्यार्थी तसेच शिक्षकांनाही मोठा लाभ होईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या नॅशनल एज्युकेशन समिट ऑफ कॉमर्स अँड अकाउंटंसी २०२४ (नेस्का) या दोन दिवसीय उपक्रमाच्या पहिल्या दिवशी सामंजस्य करार झाला. विद्यापीठाच्यावतीने वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यावेळी उपस्थित होते. या करारावर विद्यापीठाच्यावतीने



नवी दिल्ली येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'समवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. यावेळी डॉ. जयकुमार बत्रा, रणजितकुमार अग्रवाल, डॉ. श्रीकृष्ण महाजन, दयानिवास शर्मा उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे सेक्रेटरी डॉ. जयकुमार बत्रा यांनी स्वाक्षरी केल्या. दोन्हीही संस्थांनी शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण यामध्ये केलेल्या कार्यातून ज्ञान, कौशल्य यासंदर्भात उत्कृष्टता निर्माण करण्याच्या प्रक्रियेसाठी या कराराच्या माध्यमातून एकत्रित काम करण्याचा निर्णय घेतला.

01 FEB 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रियांचे राजकारण सकारात्मक बदलाचे

## मेधा कोतवाल -लेले : शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : 'स्त्रियांचे राजकारण म्हणजे केवळ निवडणुकीचे राजकारण नव्हे, तर स्त्री जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे राजकारण आहे', असे प्रतिपादन पुणे येथील 'आलोचना' संस्थेच्या संचालक मेधा कोतवाल- लेले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील 'भारतीय गणराज्य आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग' विषयावर चर्चासत्रात त्यांचे बीजभाषण झाले. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, राज्यशास्त्र विभाग, गांधी अभ्यास केंद्र व नेहरू अभ्यास केंद्रातर्फे चर्चासत्र आणि भित्तीपत्रक स्पर्धा झाली. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

मेधा कोतवाल- लेले यांनी भारतातील स्त्री चळवळी, संघटनांमुळे गेल्या ७५ वर्षात स्त्रियांच्यासाठी



कोल्हापूर : चर्चासत्रात आलोचना संस्थेच्या संचालक मेधा कोतवाल लेले यांचे बीजभाषण झाले. यावेळी शेजारी डॉ. भारती पाटील उपस्थित होत्या.

कसे कायदे होत गेले, याचा आढावा घेतला. मथुरा बलात्काराच्या घटनेनंतर स्त्री चळवळीने बलात्कारासंबंधी कायदे बदलण्यास भाग पाडले, तीच बाब लैंगिक छळाची किंवा कौटुंबिक अत्याचाराची होती. डॉ. जयश्री कांबळे यांनी 'पंचायतींमधील स्त्री नेतृत्व' या विषयावर तर डॉ. वैशाली पवार यांनी 'महाराष्ट्र विधानसभेद्वारे स्त्रियांचा राजकीय सहभाग'वर मांडणी केली.अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कार्यकर्त्या छाया राजे होत्या. डॉ. नेहा वाडेकर यांनी 'लोकसभेतील स्त्रियांचा सहभाग' वर, शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी 'स्त्रियांच्या आरक्षणाची वाटचाल'वर मांडणी केली. अध्यक्षस्थानी डॉ. रवींद्र भणगे होते. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले.

**भित्तीपत्रक स्पर्धेतील विजेते**

स्पर्धेत ९५ विद्यार्थी सहभागी झाले. विजेत्यांत लक्ष्मी कोळी, वरूण अमृते, पुनम सुर्यवंशी, गायत्री सुर्यवंशी, प्राजक्ता सुर्यवंशी, रजनीगंधा नायकवडी, मानसी पोळ यांचा समावेश आहे. डॉ. प्रतिमा पवार, सुभाष कोंबडे, कविता वड्राळे यांनी परीक्षण केले.

जनसंपर्क कक्ष
01 FEB 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात पोस्टर स्पर्धा उत्साहात

## भारतीय गणराज्य, स्त्रियांचा राजकीय सहभाग या विषयावर चर्चा


**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात 'भारतीय गणराज्य आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग' या विषयावर चर्चासत्र व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, राज्यशास्त्र विभाग, गांधी अभ्यास केंद्र व नेहरू अभ्यास केंद्रातर्फे करण्यात आले होते.

चर्चासत्राचे बीजभाषण आलोचना संस्था, पुणे यांच्या संचालिका मेधा कोतवाल-लेले यांनी केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. डॉ. भारती पाटील यांनी चर्चासत्रामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. त्यानंतरच्या दुसऱ्या सत्रात डॉ. जयश्री कांबळे यांनी पंचायतींमधील स्त्री नेतृत्व या विषयावर, तर डॉ. वैशाली पवार यांनी महाराष्ट्र विधानसभेद्वारे स्त्रियांचा राजकीय सहभाग या विषयावर मार्गदर्शन केले. छाया राजे यांनी या सत्राचे अध्यक्षस्थान भूषवले. त्यानंतरच्या सत्रात डॉ. नेहा वाडेकर यांनी लोकसभेतील स्त्रियांचा सहभाग या विषयावर, तर डॉ. भारती पाटील यांनी 'स्त्रियांच्या आरक्षणाची वाटचाल' या विषयावर मांडणी केली. या सत्रात डॉ. रवींद्र भणगे यांनी अध्यक्षस्थान भूषवले.

यावेळी आयोजित पोस्टर स्पर्धेत ९५ विद्यार्थी सहभागी झाले. त्याचे परीक्षण डॉ. प्रतिमा पवार, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. कविता वड्राळे यांनी केले. प्रथम क्रमांक लक्ष्मी कोळी, द्वितीय वरुण अमृते, तृतीय पूनम सूर्यवंशी, गायत्री सूर्यवंशी, प्राजक्ता सूर्यवंशी तर उत्तेजनार्थ रजनीगंधा नायकवडी, मानसी पोळ यांना घोषित करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2024
तरुण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातून इराकचे फैसल फलिह फैसल या पीएच.डी. प्राप्त आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांबरोबर डॉ. माधव भिलावे, डॉ. योगेश भुते, डॉ. शिवानंद यन्कंची, डॉ. अनिल घुले.

# प्राणिशास्त्र विभागाच्या परदेशी विद्यार्थ्यास प्रथमच पीएच.डी.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील इराकचे संशोधक विद्यार्थी फैसल फलिह फैसल यांना विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली. ते प्राणिशास्त्र विभागातून पीएच.डी. प्राप्त करणारे पहिले आंतरराष्ट्रीय विद्यार्थी ठरले आहेत.

फैसल यांनी 'इफेक्ट ऑफ पिरिमिकार्ब ऑन फिंगरलिंग्ज ऑफ फ्रेशवॉटर फिश सिरिन्हिस मृगला' (Effect of PirimicaR on fingerlings of freshwater fish Cirrhinus mrigala) या विषयावर शोधप्रबंध सादर केला. त्यांना प्राणिशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. माधव भिलावे यांचे मार्गदर्शन लाभले. शोधप्रबंधावरील मौखिक परीक्षेला बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ. योगेश भुते होते. अध्यक्षपद डॉ. शिवानंद यन्कंची यांनी भूषविले. यावेळी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी मंडळाचे समन्वयक प्रा. अनिल घुले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2024
लोकमत

# फैसल फलिह ठरले पीएच.डी.धारक पहिले आंतरराष्ट्रीय विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील इराकचे संशोधक विद्यार्थी फैसल फलिह फैसल यांना मंगळवारी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली. ते प्राणिशास्त्र विभागातून पीएच.डी. प्राप्त करणारे पहिले आंतरराष्ट्रीय विद्यार्थी ठरले.

फैसल यांनी 'इफेक्ट ऑफ पिरिमिकार्ब ऑन फिंगरलिंग्ज ऑफ फ्रेशवॉटर फिश सिरिन्हिस मृगला' या विषयावर शोधनिबंध सादर केला. त्यांना प्रा. डॉ. माधव भिलावे यांचे मार्गदर्शन लाभले. या शोधनिबंधावरील मौखिक परीक्षा मंगळवारी झाली. बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा. डॉ. योगेश भुते उपस्थित होते. परीक्षेचे अध्यक्षपद प्रा. डॉ. शिवानंद यंकंची यांनी भूषविले. यावेळी प्रा. अनिल घुले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2024
सकाळ

# बाडे महाविद्यालयातर्फे जनजागृती अभियान

पुनाळ : येथील सरदार रामचंद्र बाडे आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठातर्फे पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली. बेटी बचाओ अभियान कक्ष, शिवाजी विद्यापीठ व बाडे महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले होते. शिवाजी विद्यापीठाची मुख्य इमारत, मानव्यशास्त्र इमारत, राजारामपुरी परिसर, बिंदू चौक, भवानी मंडप आणि बसस्थानक या ठिकाणी विद्यार्थीनिनी पथनाट्य सादर केले. या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र विभाग, बेटी बचाओ अभियान मुख्य समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांचेही मार्गदर्शन व सहकार्य लाभले. नियोजन प्रा. जीवनप्रकाश माळवी यांनी केले. बी. ए व बी.कॉम भाग - १ मधील मुलींनी पथनाट्य सादर केले. संस्थेचे अध्यक्ष सरदार बाडे यांचे प्रोत्साहन लाभले.

0 1 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सायबर सिक्युरिटीबाबत जागरुकता आवश्यक

## मनोज पाटील : शहाजी महाविद्यालयात अग्रणी कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : "सायबर सिक्युरिटीबाबत जागरुकता आसने ही काळाची गरज आहे, याबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी आणि आपली फसवणूक टाळावी," असे आवाहन सायबर सिक्युरिटी पोलिस विभागाचे उपनिरीक्षक मनोज पाटील यांनी केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अंतर्गत न्यू कॉलेज क्लस्टरतर्फे एक दिवसीय अग्रणी कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. ॲड. निखिल इनामदार, भारती विद्यापीठाच्या प्रा. किशोरी बुधले यांनीही मार्गदर्शन केले. 'कॉमर्स'चे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण केले. प्रबंधक रवींद्र भोसले, अधीक्षक मनीष भोसले, डॉ. पांडुरंग पाटील उपस्थित होते. बीसीए विभागप्रमुख प्रा. एस. एस. शेवाडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. स्नेहल पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अमृता घोडके यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. आर. डी. मांडणीकर यांनी आभार मानले.

> पूर्वी चोरी, दरोडे मोठ्या प्रमाणात होत; पण आता सायबर गुन्ह्यातून फसवणूक होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. याबाबत सर्वांनी काळजी घ्यावी. दक्षता राखावी. कोणत्याही आलेल्या अनोळखी लिंकला क्लिक करू नये. आपला ओटीपी अथवा एटीएमची माहिती देऊ नये. बँक व्यवहाराचे डिटेल्स अगर आपली गोपनीय माहिती ऑनलाईन पद्धतीने टाकू नये. त्यातूनही कोणाची फसवणूक झाल्यास त्यांनी त्वरित संपर्क सायबर क्राईम शाखेत साधावा.
>
> - **मनोज पाटील**, पोलिस उपनिरीक्षक, सायबर सिक्युरिटी विभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2024
सकाळ

# गोखले महाविद्यालयामध्ये डिजिटल लायब्ररीवर कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : गोखले महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत ई-लर्निंग, ई-रिसोर्सेस इन ॲकॅडमिक लायब्ररीवर ही एक दिवसीय कार्यशाळा झाली. प्रा. डॉ. आर. पी. आढाव, प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर यांच्या हस्ते उद्‍घाटन झाले.

प्रा. डॉ. आढाव म्हणाले, "स्पर्धेच्या जगात ई-लर्निंग, ई रिसोर्सेसचे महत्त्व अनन्यसाधारण असून विद्यार्थ्यांनी हे ज्ञान आत्मसात करून रोजगाराच्या संधी शोधण्याचा प्रयत्न करावा." प्राचार्य डॉ. भुयेकर अध्यक्षस्थानी होते. प्रा. पी. बी. झावरे यांनी स्वागत केले.

प्रथम सत्रात प्रा. डॉ. पी. ब. बिलावर यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. कुरणे अध्यक्षस्थानी होते.

दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. तानाजी कांबळे यांनी ई-रिसोर्सेसची माहिती दिली. प्रा. डॉ. ए. ए. कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. तिसऱ्या सत्रात प्रा. पी. एस्. कल्लोळी यांनी 'एमओओसी'चे महत्व सांगितले. प्रा. जयकुमार देसाई, प्रा. डॉ. मंजिरी मोरे, दौलत देसाई यांचे प्रोत्साहन लाभले. विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी झाले. प्रा. डी. व्ही किलकिले, प्रा. पी. पी. सुतार, प्रा. पी. बी. झावरे, प्रा. डॉ. के. के. पाटोळे, प्रा. आर. एम. बिसुरे, प्रा. डॉ. सी. पी. कुरणे, प्रा. डॉ. ए. ए. कुलकर्णी, प्रा. आर. बी. सुतार उपस्थित होते. प्रा. एम. एम. काझी, प्रा. रुबिना मुल्ला यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय किलकिले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2024
लोकमत




चंडीगड विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या रग्बी संघाने सेव्हन एस साइड क्रीडा प्रकारामध्ये सुवर्णपदक पटकाविले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविले.

# शिवाजी विद्यापीठाच्या रग्बी संघाला सुवर्णपदक

**कोल्हापूर :** चंडीगड विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या दोन्ही रग्बी संघाने सेव्हन एस साइड क्रीडा प्रकारामध्ये सुवर्णपदक, तर १५ एस साइड क्रीडा प्रकारामध्ये रजत पदक पटकावले.

सेव्हन साइड प्रकारामधील मुलींच्या संघाची गुवाहाटी येथे होणाऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ राष्ट्रीय रग्बी स्पर्धेसाठी निवड झाली. दीपक पाटील व प्रा. राहुल लहाने यांनी प्रशिक्षक म्हणून तर संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. संग्रामसिंह मोरे व प्रा. अर्जुन पिटुक आहेत.